# महाराष्ट्र शासन

## सहकार व ग्रामविकास विभाग

सचिवालय, मुंबई ३२, दिनांक ३० ऑगस्ट १९६२.

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.**

क्रमांक व्ही.पी.ए.-११६३/५६८५५-पी.—मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३), याचे कलम १७६, पोट-कलम (२), कंडिका (३६) आणि कलम १३३ अन्वये मिळालेले आणि त्याबाबतीत त्यास देण्यात आलेले इतर सर्व अधिकार चालवून, महाराष्ट्र सरकार, याद्वारे मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी नियम, १९६०, यांत पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे. ही सुधारणा उक्त कलमाचे पोट-कलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे आगाऊ प्रसिद्ध करण्यात आली होती :—

१. या नियमांस मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी (सुधारणा) नियम, १९६३, असे म्हणावे.

२. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी नियम, १९६० (ज्याचा यात यापुढे "मुख्य नियम" असा उल्लेख करण्यात आला आहे), याचा नियम २ यात,—

(१) कंडिका (क), उप-कंडिका (३) मध्ये, "मुंबई राज्यात" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र राज्यात" हा मजकूर दाखल करावा ;

(२) कंडिका (इ) नंतर पुढील मजकूर दाखल करावा :—

"(फ) 'स्थायी समिती' म्हणजे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१, याच्या कलम ७९ अन्वये रचना करण्यात आलेली स्थायी समिती."

३. मुख्य नियमातील नियम ३ ऐवजी पुढील नियम दाखल करावा :—

"३. निधी कोणाकडे निहित होईल ते व त्याची व्यवस्था.—सदरहू निधी स्थायी समिती-मध्ये निहित होईल व कलम १३६ अन्वये नियुक्त केलेल्या जिल्हा ग्रामपंचायत अधिकाऱ्या-मार्फत तिने या निधीची व्यवस्था ठेवली पाहिजे."

४. मुख्य नियमातील नियम ४ मध्ये "पंचायत मंडळाने" या मजकुराऐवजी "स्थायी समितीने" हा मजकूर दाखल करावा.

५. मुख्य नियमातील नियम ५ ऐवजी पुढील नियम दाखल करावा :—

"निधीतील रकमा गुंतविणे व पुन्हा गुंतविणे.—(१) स्थायी समितीने, वेळोवेळी, पंचायतींना कर्जे देण्यासाठी किंवा पंचायतींनी दिलेल्या अंशदानाच्या रकमांवरील व्याज देण्यासाठी ताबडतोब आवश्यक नसतील अशा निधीत जमा असलेल्या सर्व रकमा राज्य सरकारच्या किंवा केंद्र सरकारच्या तारणपत्रामध्ये किंवा या बाबतीत राज्य सरकार मान्यता देईल अशा इतर तारण-पत्रामध्ये गुंतविल्या किंवा पुन्हा गुंतविल्या पाहिजेत, आणि तशाच स्वरूपाच्या इतर गुंतवणुकी-करिता अशा गुंतवणुकी बदलल्या पाहिजेत, आणि तारणपत्रापासून मिळणारे उत्पन्न आणि त्यांच्या विक्रीचे उत्पन्न अशा निधीत जमा केले पाहिजे.

(२) स्थायी समितीने निधीत जमा असलेल्या इतर सर्व रकमा—

(अ) सरकारी खजिन्यात किंवा सरकारी खजिन्याचे काम ज्या बँकेकडे सोपविण्यात आले असेल त्या बँकेत, किंवा

(ब) राज्य सरकार या बाबतीत निर्दिष्ट करील अशा शर्तींना अधीन राहून, राज्य सरकार मान्यता देईल अशा सहकारी संस्थेत,

ठेवल्या पाहिजेत."

[किंमत ६ नये पैसे]

(G.C.P.) MAR-A Va 4200 (22,035—2-64)

Scanned with OKEN Scanner

६. मुख्य नियमातील नियम ६, पोट-नियम (२) मध्ये "पंचायत मंडळास" या मजकुराऐवजी "स्थायी समितीस" हा मजकूर दाखल करावा.

७. मुख्य नियमातील नियम ७, पोट-नियम (१) मध्ये आणि स्पष्टीकरणात, "पंचायत मंडळाने" या मजकुराऐवजी "स्थायी समितीने" हा मजकूर दाखल करावा.

८. मुख्य नियमातील नियम ८ मध्ये "पंचायत मंडळाने" या मजकुराऐवजी आणि समास टीपेतील "पंचायत मंडळांनी" या मजकुराऐवजी "स्थायी समितीने" हा मजकूर दाखल करावा.

९. मुख्य नियमातील नियम ९ मध्ये "पंचायत मंडळाने" या मजकुराऐवजी "स्थायी समितीने" हा मजकूर दाखल करावा.

१०. मुख्य नियमातील नियम १०, पोट-नियम (१) मध्ये,—

"पंचायत मंडळास" या मजकुराऐवजी "स्थायी समितीस" हा मजकूर दाखल करावा.

११. मुख्य नियमातील नियम ११ मध्ये,—

(अ) "पंचायत मंडळास" या मजकुराऐवजी "स्थायी समितीस" हा मजकूर दाखल करावा ;

(ब) कंडिका (३) मध्ये—

(१) "अशी चौकशी करविल्यानंतर" या मजकुराऐवजी "अशी चौकशी केल्यानंतर" हा मजकूर दाखल करावा;

(२) उप-कंडिका (३) व (४) ऐवजी पुढील कंडिका दाखल कराव्या :—

"(३) कर्जाची रक्कम ३०,००० रुपयांहून अधिक असता कामा नये; आणि

(४) जेथे कर्जाची रक्कम ३०,००० रुपयांहून अधिक असेल तेथे कर्ज देण्यास जिल्हा परिषदेने पूर्वसंमती दिलेली असली पाहिजे."

(क) समास टीपेमध्ये "पंचायत मंडळास" या मजकुराऐवजी "स्थायी समितीस" हा मजकूर दाखल करावा.

१२. मुख्य नियमातील नियम १२ मध्ये,—

(अ) "पंचायत मंडळाकडून", "पंचायत मंडळास", "पंचायत मंडळाच्या" हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी येईल त्या त्या ठिकाणी त्याऐवजी "स्थायी समितीकडून", "स्थायी समितीस", "स्थायी समितीच्या" हा मजकूर दाखल करावा ;

(ब) पोट-नियम (२) नंतर पुढील परंतुक जादा दाखल करावे :—

"परंतु, अशा कोणत्याही तहकुबीमुळे, कर्जाच्या परतफेडीची मुदत दहा वर्षांहून अधिक होता कामा नये किंवा पोट-नियम (१)च्या पहिल्या परंतुकान्वये परतफेडीची मुदत वाढविली असेल तेव्हा ती पंधरा वर्षांहून अधिक होता कामा नये."

१३. मुख्य नियमातील नियम १४ मध्ये, "जिल्हा ग्रामपंचायत मंडळाने" आणि "पंचायत मंडळाने" या प्रत्येक मजकुराऐवजी "स्थायी समितीने" हा मजकूर दाखल करावा.

१४. मुख्य नियमातील नियम १५ मध्ये "पंचायत मंडळ" या मजकुराऐवजी "स्थायी समिती" हा मजकूर दाखल करावा.

Scanned with OKEN Scanner

Bombay Village Panchayats Act, 1963.
Amendments to Bombay District
Village Development Fund Rules, 1963.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Co-operation and R...



१५. मुख्य नियमास जोडलेल्या अनुसूचीत—

(अ) "जिल्हा ग्रामपंचायत मंडळाने" हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी येईल त्या त्या ठिकाणी त्या मजकुराऐवजी "स्थायी समितीने" हा मजकूर दाखल करावा ;

(ब) परिच्छेद २ मध्ये, "जिल्हा पंचायत अधिकाऱ्यासमक्ष" या मजकुराऐवजी "जिल्हा ग्रामपंचायत अधिकाऱ्यासमक्ष" हा मजकूर दाखल करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशावरून व त्यांच्या नावाने,

एम्. व्ही. देव,
शासन सचिव.

(True translation)
P. S. THORAT,
Examiner of Books and Publications, Bombay.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.